


दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**




● वर्ष : ०१ ● अंक : २१४ ● गुरुवार दि. १६ मे २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये

● Volum : 1 ● Issue : 114 ● Thursday,16 May 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-



नवले हॉस्पिटल परिसरातील रस्त्यावर... 3



मावळमध्ये प्रचार खर्चात आघाडीवर बारणे की... 4

## ठळक बातम्या

### 22 मे पर्यंत 'या' राज्यांना यलो अलर्ट

**मुंबई : (आरंभ पर्व)** यंदा शुक्रवार 31 मे रोजी एक दिवस आधीच मान्सून भारतातील केरळमध्ये दाखल होत आहे. या पार्श्वभूमीवर बुधवार 22 मे पर्यंत भारतातील बहुतांश राज्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान भारताच्या दक्षिण द्वीपकल्पीय प्रदेशातील बहुतांश राज्यांना मान्सूनपूर्व पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या संदर्भातील माहिती भारतीय हवामान विभागाने X पोस्टवरून दिली आहे. हवामान विभागाने नुकत्याच दिलेल्या बुलेटीनमध्ये म्हटले आहे की, " 22 मे पर्यंत दक्षिण द्वीपकल्पीय भारतामध्ये मुसळधार ते अति मुसळधार पाऊस सुरू राहणार आहे. गुरुवार 16 मे ते सोमवार 20 मे दरम्यान तामिळनाडू तर सोमवार 20 मे पर्यंत केरळमध्ये अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

### मनोज जरांगेंची 8 जूनची सभा रद्द

**बीड : (आरंभ पर्व)** बीडच्या नारायणगड येथे 8 जून रोजी होणारी सभा पुढे ढकलली आहे, आता त्या सभेच्या अनुषंगानेच 4 जून उपोषणाची तारीख जाहीर केली होती. परंतु सभा पुढे ढकलल्याने मी त्याआधीच उपोषण सुरू करणार असल्याची माहिती मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिली. बीडच्या केज तालुक्यातील नांदुर घाट येथे झालेल्या दगडफेकीत मराठा समाज बांधव जखमी झाले आहेत.

# उमेदवारांच्या वाडेश्वर कट्ट्याचे आयोजन

## मी काही पवारसाहेबाच्या किंवा विखे पाटलांच्या घरी जन्माला आलो नाही : रविंद्र धंगेकर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे लोकसभेच्या निवडणुकीच मतदान दोन दिवसांपूर्वी झाले. या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर आणि वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे हे तिघेजण निवडणुकीच्या रिंगणात होते. या तिघांनी जवळपास 50 दिवसाहून अधिक काळ शहराच्या अनेक भागात जाऊन प्रचार सभा, रॅली, पदयात्रा काढत मतदारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. त्या प्रत्येक उमेदवारांला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे पाहण्यास मिळाले.

या निवडणुकीचे मतदान होऊन दोन दिवस झाले असून याचा निकाल 4 जून रोजी लागणार आहे. पण त्याच दरम्यान पुण्यातील शरद पवार गटाचे अंकुश काकडे, श्रीकांत शिरोळे यांनी दरवर्षीप्रमाणे निवडणुकीपूर्वी आणि नंतर उमेदवारांच्या वाडेश्वर कट्ट्याचे आयोजन केले होते. यावेळी रविंद्र धंगेकर आणि वसंत मोरे यांनी उपस्थित राहून इडली चटणी,शिरा खात दोघांनी निवडणुकीमधील आलेले अनुभव खेळीमेळीच्या वातावरणात सांगितले. मात्र यावेळी मुरलीधर मोहोळ हे काही वैयक्तिक कारणास्तव येऊ शकले नाही.



> या निवडणुकीत महाविकास आघाडीतील अनेक वरीष्ठ नेत्यांच्या सभा झाल्या. त्यामध्ये राहुल गांधी यांच्या सभेवेळी उपस्थित जनसमुदाय पाहून राहुल गांधी म्हणाले की, आपण ४ तारखेनंतर संसदेत भेटू, त्यामुळे निश्चित मी निवडून येईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी रविंद्र धंगेकर म्हणाले की, मी आजवर दहा निवडणुका लढलो. त्या निवडणुकामध्ये काही वेळा विजय, तर काही वेळा पराभव पाहण्यास मिळाला. त्यामुळे प्रत्येक निवडणुकीत काही तरी शिकायला मिळाले. तसं याही निवडणुकीत खूप काही शिकलो. पण या निवडणुकीत माझ्या कुटुंबावर टीका करण्यात आली. त्यामुळे मला प्रचंड त्रास झाला आणि त्रास सहन देखील केला. यामुळे माझं कुटुंब उध्वस्त होण्याची वेळ आली होती. पण मी याचं उत्तर येत्या काळात निश्चित देईल. तसेच या सर्व प्रकारामुळे माझ्र वैयक्तिक आणि आर्थिक मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. माझे कितीही नुकसान होऊ द्या, मी काही घाबरत नाही. मी काहीच घेऊन आलो नव्हतो आणि काही घेऊन जाणार नाही. मी काही पवारसाहेबाच्या किंवा विखे पाटलांच्या घरी जन्माला आलो नाही. त्यामुळे येत्या काळात त्यांना नक्कीच उत्तर दिल जाईल असे सांगत भाजप नेत्यांना त्यांनी सुनावले.

## पुण्याचा उमेदवार 20 ते 25 हजार मतांनी निवडून येईल : मोरे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे लोकसभेच्या निवडणुकीच मतदान दोन दिवसांपूर्वी झाले. या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर आणि वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे हे तिघेजण निवडणुकीच्या रिंगणात होते. या तिघांनी जवळपास 50 दिवसाहून अधिक काळ शहराच्या अनेक भागात जाऊन प्रचार सभा, रॅली, पदयात्रा काढत मतदारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला.त्या प्रत्येक उमेदवारांला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे पाहण्यास मिळाले. निवडणुकीचे मतदान होऊन दोन दिवस झाले असून याचा निकाल 4 जून रोजी लागणार आहे. पण त्याच दरम्यान पुण्यातील शरद पवार गटाचे अंकुश काकडे, श्रीकांत शिरोळे यांनी दरवर्षीप्रमाणे निवडणुकीपूर्वी आणि नंतर उमेदवारांच्या वाडेश्वर कट्टयाचे आयोजन केले होते. यावेळी रविंद्र धंगेकर आणि वसंत मोरे यांनी उपस्थित राहून इडली चटणी, शिरा



खात दोघांनी निवडणुकीमधील आलेले अनुभव खेळीमेळीच्या वातावरणात सांगितले. मात्र यावेळी मुरलीधर मोहोळ हे काही वैयक्तिक कारणास्तव येऊ शकले नाही. यावेळी वसंत मोरे म्हणाले की, मी शहरातील शेवटच्या घटकापर्यंत जाऊन प्रचार केला. प्रत्येक ठिकाणी नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. मी स्थानिक आणि विकासाच्या मुद्यावर ही निवडणूक लढवली. या निवडणुकीमधील अनेक आठवणी आहेत. पण यंदाची मतदानाची टक्केवारी लक्षात घेतल्यावर मला 4 लाखांच्या आसपास मत मिळतील आणि जो कोणी उमदेवार निवडून येईल. तो किमान 20 ते 25 हजार मतांनी निवडून येण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

## भविष्यात प्रत्येकाचा हिशोब होणार

महाराष्ट्र नवनिर्माण सेना

रविंद्र धंगेकर आणि तुम्ही शिवसेना, मनसेमध्ये एकत्रित काम केले आहे. यानंतर दोघे ही वेगळ्या पक्षात करीत आहात, त्या पक्षातील अनुभवांबाबत वसंत मोरे म्हणाले की, मी वंचित बहुजन आघाडीमध्ये येऊन महिना झाला असताना मला कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी खूप प्रेम दिले. मी ज्या पूर्वाश्रमीच्या (मनसे) पक्षात २० वर्ष राहीलो. त्या काळात (राज ठाकरे ) साहेबांनी खूप प्रेम दिले. पण पक्षातील (मनसे) पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कधीच प्रेम दिले नाही. त्यांनी कायम पाय खेचण्याच काम केलं असल्याची खंत व्यक्त करीत पुढे म्हणाले की, भविष्यात प्रत्येकाचा हिशोब होणार असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मोरे यांनी पुण्यातील स्थानिक मनसेच्या नेत्यांना दिला. यानंतर रविंद्र धंगेकर म्हणाले की, काँग्रेसकडून कसबा पोटनिवडणुक लढविण्याची संधी मिळाली. त्या संधीच सोनं केलं आणि त्या निवडणुकीला वर्ष होत नाही. तोवर आता लोकसभा निवडणुक लढविण्याची संधी दिली. त्यामुळे याही निवडणुकीत देखील मी विजयी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# पुणे शहरात 85 अनधिकृत जाहिरात फलक

## जाहिरात फलक उभारताना आकाशचिन्ह आणि परवाना विभागाची परवानगी घेणे बंधनकारक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरात बेकायदा जाहिरात फलकांचे (होर्डिंग) पेव फुटले असताना महापालिकेच्या आकडेवारीनुसार शहरात फक्त 85 अनधिकृत जाहिरात फलक असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सर्वाधिक 84, तर औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत एक अनधिकृत जाहिरात फलक आहे. तसेच दोन हजार 598 अधिकृत जाहिरात फलकांपैकी दोन हजार 249 जाहिरात फलकांचे स्थापत्य लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्यात आले आहे. व्यावसायिक जाहिरात फलक परवानगी घेऊनच उभारण्यात आले असून, तात्पुरत्या स्वरूपातील फलकांची उभारणी करताना परवानगी घेतली जात नसल्याचा दावाही प्रशासनाकडून करण्यात आला आहे. मुंबई येथील घाटकोपर येथे जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी मंगळवारी तातडीने आढावा बैठक घेतली. त्यानंतर सर्व अधिकृत जाहिरात फलकांचे स्थापत्य लेखापरीक्षण अहवाल करून घेण्याची, तसेच अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करून त्याबाबतचा अहवाल दोन दिवसांत देण्याची सूचना डॉ. भोसले यांनी परवाना आणि आकाशचिन्ह विभागाच्या अधिकाऱ्यांना केली. या बैठकीत केवळ 85 जाहिरात फलक अनधिकृत असल्याची माहिती आकडेवारीसह आयुक्तांना देण्यात आली. शहरातील प्रत्येक चौकात, गल्लीबोळात, रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर विनापरवाना जाहिरात फलकांची उभारणी करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांचा मुद्दा सातत्याने ऐरणीवर आला होता. या पार्श्वभूमीवर शहरातील अधिकृत आणि अनधिकृत जाहिरात फलकांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय महापालिकेच्या परवाना आणि आकाशचिन्ह विभागाकडून घेण्यात आला होता. त्यानुसार शहरात दोन हजार 598 अधिकृत जाहिरात फलक असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली. जाहिरात फलक उभारताना आकाशचिन्ह आणि परवाना विभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, परवानगी न घेता जाहिरात फलक उभारले जात आहेत. तथापि हे सर्व जाहिरात फलक तात्पुरत्या स्वरूपाचे आहेत. व्यावसायिक जाहिरात फलक परवानगी घेऊन उभारण्यात आले असून, त्यांचा आकारही परवानगीनुसारच आहे, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. दरम्यान, महापालिका प्रशासनाकडून अनधिकृत जाहिरात फलकांवर वेळोवेळी कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार ही कारवाई कायम ठेवण्यात येईल. पावसाळ्यात किंवा सध्याच्या अवकाळी पावसात जाहिरात फलक कोसळून दुर्घटना होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, असे परवाना आणि आकाशचिन्ह विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी सांगितले.


> अनधिकृत फलकांवरील कारवाईची संख्या – १,५६४
> स्थापत्य लेखापरीक्षण अहवाल- २,२४९
> अधिकृत जाहिरात फलक- २,५९८
> अनधिकृत जाहिरात फलक- ८५

> शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करण्याचे आणि दोन दिवसांत अहवाल देण्याची सूचना परवाना आणि आकाशचिन्ह विभागाच्या अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे. शहरात केवळ ८५ जाहिरात फलक अनधिकृत आहेत. अधिकृत जाहिरात फलक धोकादायक नाहीत.
>
> \- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR

आपला बायोटाडा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२





# पुढचा हिंदूहृदयसम्राट कोण? उद्धव ठाकरे की राज ठाकरे



2019 मध्ये, शिवसेनेचे विद्यमान अध्यक्ष उद्धव ठाकरे यांना त्यांचे वडील आणि शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रबळ हिंदुत्वाच्या विचारसरणीशी तडजोड करावी लागली. काँग्रेस आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याशी युती करून मुख्यमंत्रिपद मिळवले.

अर्थात उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद देण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी काही अटींची पूर्तता करण्यास सांगितले. असा कयास आहे. हिंदुत्वाला तिलांजली देणे हे त्यापैकी एक आहे. त्यानी कितीही प्रयत्न केले तरी; हा इतिहास उद्धव ठाकरे कधीही पुसून टाकू शकणार नाहीत. राजकीय गटांशी संगनमत पाहता हिंदुत्वाबद्दल बोलणे त्यांनी टाळले आहे. दुसरीकडे, मराठी माणसांचा आवाज उठवणारे आणि हिदुत्वासाठी सदैव उभे राहणारे उध्दव ठाकरे यांचे चुलत बंधू राज ठाकरे यांनी नेहमीच आदरणीय बाळासाहेब ठाकरेच्या पावलावर पाऊल ठेवले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवला. हे पाहता एक प्रश्न मनात उपस्थित होतो की, बाळासाहेब ठाकरे यांच्या नंतरचा "खरा" हिंदुहृदयसम्राट कोण? बाळासाहेब ठाकरेंच्या हिंदुत्वाच्या वारशाचा खरा वारस कोण? उद्धव ठाकरे की राज ठाकरे?

2022 मध्ये राज ठाकरे यांनी आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांचा व्हिडीओ ट्विटर या समाजमाध्यमावर प्रकाशित केला होता. भगवी शाल अंगावर घेतलेले बाळासाहेब बोलत असताना हजारोंचा जनसमुदाय मंत्रमुग्ध होऊन त्यांचे बोलणे ऐकत असे. "आमचे सरकार सत्तेत आल्यास रस्त्यावरील नमाजपठणाची प्रथा आपण बंद करणार आहोत. यामुळे रस्ते अडवले जातात आणि सामान्य नागरिकांना त्रास होतो. लोकांना धर्म हा उपद्रव आहे असे वाटू नये. आमच्या हिंदू धर्माचा कोणाला उपद्रव होत असेल तर लोकांनी आम्हाला सांगावे आणि मी त्याची काळजी घेईन. तसेच मशिदींवरील लाऊडस्पीकर खाली यायला हवे" देवाची भक्ती करताना इतरांना त्रास होणार नाही याची खबरदारी सर्वांनीच घेतली पाहिजे अशी बाळासाहेबांची त्यामागील भावना होती. राज्य सरकारने मशिदीबाहेरील त्रासदायक उपकरणे हटवण्याबाबत सूचना द्याव्यात असे राज ठाकरे यांनी सुचवले होते. अन्यथा "मशिदींसमोर हनुमान चालीसा मोठ्या आवाजात (अजानपेक्षा) वाजवली जाईल" असे मनसे प्रमुखांनी सांगितले. त्यांनी राज्यभरातील मशिदींमधून लाऊडस्पीकर काढण्यासाठी 3 मेची "डेडलाइन" देखील दिली होती आणि लाऊडस्पीकर काढले नाहीत तर 4 मे पासून हिंदूंना मशिदीबाहेर हनुमान चालीसा वाजवण्याचे आवाहन केले होते. या पार्श्वभूमीवर त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांचा व्हिडीओ शेअर केला होता. उद्धव ठाकरे सरकार सत्तेत असताना दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर चालत असल्याचा दावा सातत्याने करत असली तरी प्रत्यक्षात त्यांची कृती बाळासाहेबांच्या विचारांच्या आणि आदर्शांच्या विरुद्ध असल्याचे पक्षाचे मत होते. राज ठाकरे यांच्या मागणीनंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारला लाऊडस्पीकरच्या वापराबाबत निर्णय घेण्यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची बैठक बोलावणे भाग पडले. पुढे, महाविकास आघाडी सरकारने जाहीर केले की योग्य त्या पुर्व परवानगीने केवळ धार्मिक स्थळे आणि कार्यक्रमांमध्ये लाऊडस्पीकरचा वापर केला जाऊ शकतो. नंतर 2023 मध्ये, मुंबई उच्च न्यायालयाने मशिदींमध्ये लावलेल्या लाऊडस्पीकरमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाविरोधात कारवाई न केल्याबद्दल मुंबई पोलिसांना फटकारले होते. "मशिदींमधून होणाऱ्या ध्वनिप्रदूषणावर कारवाई करण्यात अयशस्वी होणे म्हणजे न्यायालयाचा अवमान आहे," असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते. 2023 मध्ये पुन्हा एकदा राज ठाकरे यांनी मुंबईतील माहिममधील अनधिकृत दरगाह आणि मजारीविरोधात आवाज उठवला होता. माहिममधील मकदुम बाबा दर्ग्यानजिक अनधिकृत आणखी एक दर्गा असल्याबद्दल त्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. हा कुणाचा दर्गा आहे? काही वर्षांपुर्वी इथे नसलेला हा दर्गा माशाचा आहे का? हा अनधिकृत दर्गा हटवला नाही तर त्या ठिकाणी गणपतीचं मंदिर उभारण्यात येईल असा इशारा राज ठोकरे यांनी दिला होता. मनसेने एक व्हिडिओ देखील शेअर केला आहे ज्यामध्ये असे म्हटले आहे की समुद्राच्या मध्यभागी एक 'नवीन हाजी अली' उभारला जात आहे आणि हे काम ठळकपणे दिसत असूनही पोलिस आणि पालिकेला ते दिसले नाही का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता. त्याच्या इशाऱ्यानंतर अवघ्या 24 तासांच्या आत, मुंबई पोलिसांसह राज्य महसूल विभाग आणि बीएमसीने हे बांधकाम पाडले. त्यानंतर लगेचच त्यांनी पनवेलमधील कथित बेकायदेशीर दर्गाही पाडण्याची मागणी केली. तसंच एका टेकडीवरील अतिक्रमण 15 वर्षांपूर्वी सुरू झाले आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ असलेला हा "दर्गा" राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोका असल्याचं राज ठाकरे यांनी निदर्शनास आणून दिले होते. राज्य सरकारने दर्गा पाडावा, अशी मागणी करणारे बॅनरही पक्षाने लावले.

आझाद मैदान दंगलीविरुद्ध आवाज उठवा

ऑगस्टमध्ये रझा अकादमीने बर्मा आणि आसाममधील मुस्लिमांच्या हत्यांविरोधात कथित छळाच्या विरोधात हिंसक आंदोलन आयोजित केले तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांनी राज्य सरकार आणि पोलिस आयुक्त अरूप पटनायक यांच्यावर टीका केली होती. अशा पोलीस आयुक्तांना पाठीशी घालणारे सरकार, मुख्यमंत्री आणि गृहमंत्री हे समाजाचे आणि देशाचे शत्रू आहेत असं ठाकरे त्यावेळी म्हणाले. ठाकरे पुढे म्हणाले होते कि, "आम्ही असे कधीच म्हटले नाही की सर्व मुस्लिम कट्टरपंथी किंवा पाकिस्तानप्रेमी आहेत आणि ते अशा प्रकारची भाषादेखील बोलणार नाहीत. तथापि, मूठभर कट्टरपंथी आणि देशद्रोही मुस्लिमांनी त्यांच्या संपूर्ण समाजावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे असंही शिवसेनाप्रमुख म्हणाले. त्याचप्रमाणे 11 ऑगस्टच्या दंगलीच्या विरोधात राज ठाकरे यांना परवानगी नाकारली असतानाही त्यांनी मार्च काढला. ज्या हिंसक दंगलीमध्ये दोन लोकांचा मृत्यू झाला आणि 50 हून अधिक पोलीस कर्मचारी जखमी झाले होते त्या दंगली विरोधात राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या रॅलींची योजना आखली होती. या मोर्चात आणि आझाद मैदानावरील जाहीर सभेत 30 हजार ते 1 लाखांहून अधिक लोक सहभागी झाले होते. राज यांनी 11 ऑगस्टच्या हिंसाचारासाठी राज्याचे गृहमंत्री आणि शहर पोलिस प्रमुख यांची तात्काळ हकालपट्टी करण्याची मागणी केली. पुढे राज ठाकरे असेही म्हणाले की," ही हिंसा म्हणजे बांगलादेशी आणि पाकिस्तानी स्थलांतरितांचे कृत्य असून त्यांनी शहरात आपले पाय रोवले आहेत." "कारण, हे सगळे लोक तिथून इथे येत आहेत. हे सर्व पाकिस्तानी आणि बांगलादेशी यांनी घुसखोरी करून उत्तर प्रदेश, बिहार आणि झारखंडमध्ये तळ उभारले असून ते सर्व भरलेल्या गाड्यांमधून येथे येत आहेत आणि मुंबईत आपले अड्डे उभारत आहेत जे भविष्यात आपल्यासाठी अडचणीचे ठरणार आहे. त्यावेळी त्यांनी तमाम महाराष्ट्रीयनांना एक मोठा संदेश दिला होता ज्याबद्दल बाळासाहेब ठाकरे इतकी वर्षे बोलत होते. तो संदेश म्हणजे "मला फक्त एकच धर्म माहित आहे आणि तो म्हणजे महाराष्ट्र धर्म, मला दुसरा कोणताही धर्म समजत नाही."

# रोजगार सेवक, कंत्राटी अभियंता यांचा महाप्रताप थांबता थांबेना!

**सेनगाव / गणेश सुतार (दै. आरंभ पर्व)**

- वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सदरील विभागाकडे दुर्लक्ष का होते नागरिकांमध्ये उलट सुलट चर्चा

सेनगाव तालुक्यातील विविध गावांमध्ये रोजगार हमी योजनेच्या कामाची देखील दामाजी शिवाय पुढे सरकत नसल्याचे नागरिकांत बोलले जात आहे त्यामुळे रोजगार हमी योजना म्हणजे आवो चोरो बांधो भारा आधा तुम्हारा आधा हमारा या म्हणी प्रमाणे संपूर्ण रोजगार हमी योजनेचा कामकाज चालत असल्याचे अनेक गावात प्रकार उघडकीस आले आहेत. मात्र लाभार्थी आपण केलेल्या कामाचे बिल काढण्यासाठी पंचायत समिती कार्यालयात चकरा मारून हात बल होत आहे तर रोजगार सेवक व दलाल मंडळी तुमचे बिल काढण्याचे असल्यास अधिकारी व कंत्राटी अभियंता यांना पैसे दिल्याशिवाय बिल निघत नाही असा फतवा सबंधितात कडून पसरविला जात असल्याचा आरोप लाभार्थ्यांतून केला जात असल्याचे चित्र पंचायत समिती परिसरात पहावयास मिळत आहे. या संबंधित विभागाचे अनेक वेळा वृत्त प्रकाशित केले मात्र रोजगार सेवक व कंत्राटी अभियंता यांचा दिवसात दिवस महाप्रताप थांबता थांबेना सदरील लाभार्थ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्याकडे बोगस कामाचे निवेदन दिल्यास संबंधित विभागाचे विभाग प्रमुख व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सदरील विभागाकडे दुर्लक्ष का केले जाते याची लाभार्थी व नागरिकातून उलट सुलट चर्चा सुरु असून सेनगाव तालुक्यात अद्यापही अशा बोगस काम करणाऱ्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाई केली नसल्याचा आरोप तालुक्यातील नागरिकांतून केला जात आहे. सेनगाव तालुका हा पूर्णपणे मागासलेला तालुका म्हणून या तालुक्याची ओळख प्रशासन दरबारी आहे. या तालुक्यात जलसिंचनाचे एखादे मोठे धरण नसून उजवा व डावा कालवा अध्यापही नसल्यामुळे या तालुक्यातील शेतकरी मजूर वर्ग हे शेतीवर अवलंबून असतात मात्र शासनामार्फत अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना शेततळे जनावरांचा कोठा पांदण रस्ते आधी कामे रोजगार हमी योजनेअंतर्गत तालुक्यात सुरु आहेत या कामाचे मस्टर व कुशल बिल काढण्यासाठी लाभार्थ्यांची आर्थिक लूट केली जात असल्याचा प्रकार पंचायत समितीमध्ये सुरु आहे कामे मोठ्या प्रमाणात चालू असून बहुतांश कामेही रोजगाराला रोजगार उपलब्ध न करता ती कामे पूर्णता यंत्रिक पद्धतीने केले जात आहेत परंतु शासनाच्या परिपत्रकानुसार कुठलीही योजनेचे मस्टर काढण्यासाठी मजूर हे कामाच्या ठिकाणी उभे करून त्यांचे फोटो अपलोड करणे सक्तीचे असल्याने रोजगार हमी योजनेत कार्यरत असलेले गुत्तेदार हे भोळ्या बाबड्या जनतेला थोडीफार आर्थिक चिरीमिरी देऊन फोटो काढण्यासाठी गावातील मजुरांना नेत असून ते फोटो दाखवून लाखो रुपयांचा निधी लागण्याचा प्रकार चालू आहे तालुक्यातील काही गावातून प्रशासनाला बोगस कामे होत असून रोजगार सेवक व कंत्राटी अभियंता हे चिरीमिरी घेऊन सदरील कामाचे बिल काढून देत असल्याचे चित्र तालुक्यात पाहवयास मिळत आहे पण वरिष्ठ अधिकारी सदरील या कामाची घटनास्थळी येऊन पाहणी न करता त्या कामाचे पूर्णत्व बिल कसे निघत आहे हा प्रश्न नागरिकांतून ऐकण्यास मिळत आहे. जिल्हा प्रशासन विभाग सेनगाव पंचायत समिती मधील रोजगार सेवक व कंत्राटी अभियंता व सदरील विभाग प्रमुख यांची चौकशी करते का त्यांना पाठीशी घालते याकडे संपूर्ण सेनगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.


## थोडक्यात



### निवृत्त लष्करी अधिकाऱ्याकडून ग्रामस्थांवर गोळीबार

**पुणे (आरंभ पर्व) :** भोर तालुक्यातील पसुरे गावात कुंपण टाकण्याच्या वादातून निवृत्त लष्करी अधिकाऱ्याने ग्रामस्थांवर गोळीबार केल्याची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. लष्करी अधिकाऱ्याने गोळीबार केल्याचे चित्रफीत समाजमाध्यमातून प्रसारित झाली. भोर तालुक्यातील पसुरे गावात एका सेवानिवृत्त लष्करी अधिकाऱ्याने बंगला (फार्म हाऊस) बांधला आहे. लष्करी अधिकारी वाकड भागात राहायला आहे. बंगल्याच्या परिसरात खांब, तसेच कुंपण बांधण्यावरून लष्करी अधिकाऱ्याचा ग्रामस्थांशी वाद झाला. त्यानंतर अधिकाऱ्याने त्याच्याकडील बंदुकीतून हवेत दोन गोळ्या झाडल्या. ग्रामस्थांना धमकावले, अशी माहिती पोलिसांनी दिली. अधिकाऱ्याने हवेत गोळीबार केल्याचे चित्रीकरण मोबाइलवर ग्रामस्थांनी केले. याबाबतची चित्रफीत समाजमाध्यमात प्रसारित झाली.

# पोलीसांच्या ताब्यातील आरोपी रेल्वेतून उडी मारून पसार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबईहून रेल्वेने पुण्याकडे येत असताना आरोपी रेल्वेतून उडी मारून पसार झाल्याची घटना देहूरोड परिसरात घडली. विशाल हर्षद शर्मा असे पसार झालेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार विशाल शर्मा हा एका गुन्ह्यातील आरोपी असून तो येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत होता. 13 मे रोजी गुरुग्राम येथील न्यायालयात हजर करण्यासाठी विशालला नेण्यात आले होते. 15 मे रोजी आरोपीला मुंबईहून रेल्वेने पुणे पोलीस त्याला घेऊन येत होते.

त्याने बेडीसह देहूरोड परिसरात धावत्या रेल्वेतून उडी मारली यांप्रकरणी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

# 'सूर्यदत्त'मधील बीएस्सीच्या विद्यार्थ्यांचे वार्षिक परीक्षेत घवघवीत यश

- बीएस्सी इन सायबर सिक्युरिटी अँड डिजिटल सायन्सचा निकाल १०० टक्के
- १४ विद्यार्थ्यांना 'ए प्लस', तर २२ विद्यार्थ्यांना 'ए' श्रेणी



कुणाल निलेश गावंडे | कपिल श्रीपाद कुलकर्णी | स्वरूप रवींद्र देशपांडे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित सूर्यदत्त इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायबर सिक्युरिटीच्या बीएस्सी इन सायबर सिक्युरिटी अँड डिजिटल सायन्सचा निकाल सलग दुसऱ्या वर्षी 100 टक्के लागला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील किंबहुना भारतातील पहिलाच अभ्यासक्रम असलेल्या बीएस्सी इन सायबर सिक्युरिटी अँड डिजिटल सायन्समधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. एप्रिल 2024 मध्ये घेण्यात आलेल्या वार्षिक परीक्षेला तृतीय वर्षातील 37 विद्यार्थी बसले होते. त्यापैकी 14 विद्यार्थ्यांना 'ए प्लस', तर 22 विद्यार्थ्यांना 'ए' श्रेणी मिळाली आहे. कुणाल निलेश गावंडे (86.05 टक्के), कपिल श्रीपाद कुलकर्णी (82.16 टक्के), तर स्वरुप रवींद्र देशपांडे (81.18 टक्के) यांनी 'ए प्लस' श्रेणीसह अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकवला आहे. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे व प्राचार्य डॉ. अरिफ शेख यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "सायबर सिक्युरिटी अँड डिजिटल सायन्समध्ये बीएस्सी या उदयोन्मुख शाखेतील दुसऱ्या तुकडीतून सलग दुसऱ्या वर्षी सायबर सिक्युरिटी विषयाचे 37 विद्यार्थी 'सूर्यदत्त' संस्थेतून उत्तीर्ण झाले. भारतासह संपूर्ण जगातून सायबर सिक्युरिटी विषयातील तज्ज्ञांची गरज स्पष्ट होत असताना सूर्यदत्त ही गरज पूर्ण करण्याचा यशस्वी प्रयत्न करत आहे, याचा आनंद वाटतो. नुकत्याच घेण्यात आलेलया 'सायबेक्स कॉनक्लेव'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. देशभरातून आलेल्या सायबर सिक्युरिटी अँड डिजिटल सायन्स क्षेत्रातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. आधुनिक जगातील गरजांना ओळखून युवा पिढीला सक्षम करण्याचा प्रयत्न सूर्यदत्त सातत्याने करत आहे."

# मजूर अड्ड्यावरील कामगारांवर उपासमारीची वेळ



- रोहन सुरवसे-पाटील यांची मदतीची मागणी
- राज्यकर्ते एकमेकांवर चिखलफेक करण्यात दंग असल्याची टीका

**पुणे : (दै. आरंभ पर्व)**

शहर आणि उपनगरातील मजूर अड्ड्यावर दिवसेंदिवस रोजगार मागणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे मजुरांना आठवड्यातून तीन-चार दिवसच रोजगार मिळत आहे. परिणामी, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. एकीकडे महागाईने कळस गाठला आहे, तर दुसरीकडे रोजगार मिळत नाही, त्यामुळे मजुरांनी जगायचे तरी कसे? अशी मजूरवर्गाची कैफियत आहे, असे महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील यांनी सांगितले.

सुरवसे-पाटील म्हणाले की, महागाईचा आगडोंब उसळला आहे, उन्हाचा कडाका सहन होईना, प्यायला पाणी नाही, खायला अन्न नाही, अशी अवस्था मजूर वर्गाची झाली आहे. केंद्र आणि राज्य सरकारमधील सत्ताधारी निवडणुकीच्या धामधुमीत गुंतले आहेत. गरिबांकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नाही. मागील दहा वर्षांपासून केंद्र आणि राज्यामध्ये भाजप सरकार आहे. कष्टकरी-मजुरांसाठी रोजगार का उपलब्ध करून दिला नाही, शेतमालाला भाव नाही, राज्यकर्ते फक्त एकमेकावर चिखलफेक करण्यात दंग झाले आहेत. या गरिबांना दोन वेळचे जेवण आणि घोटभर पाणीसुद्धा मिळत नाही, अशी अवस्था झाली आहे.

रोजगार मिळत नसल्याने सामान्य कष्टकरी हतबल झाला आहे. आणखी 15 दिवसांनी शाळा सुरु होतील, मुला-बाळांना कपडे, दप्तर, पुस्तके कशी घ्यायची असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे. दहावी, बारावीतील मुलांना पुढील शिक्षणासाठी पैसा कोठून उभा करायचा अशा चिंतेत ही मंडळी आहेत. राज्यकर्त्यांनी किमान मजुरांच्या मुलांसाठी विशेष योजनेद्वारे मदत करावी, अशी मागणी सुरवसे-पाटील यांनी केली आहे.

# रेडमी नोट 13 प्रो+ 5जी वर्ल्ड चॅम्पियन्स एडिशन लॉंचची घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शाओमी या सर्वात विश्वसनीय व लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँडने जगभरात 15 दशलक्ष रेडमी नोट सिरीज युनिट्सच्या विक्रीला पार करण्याचा उल्लेखनीय टप्पा संपादित केला. या भव्य यशाला साजरे करत शाओमी सिरीजच्या किमतीमध्ये मोठ्या घटची अणि अर्जेन्टाइन फूटबॉल असोसिएशन (एएफए) सोबत सहयोगाने इंडिया एक्सक्लुसिव्ह रेडमी नोट 13 प्रो+ 5जी वर्ल्ड चॅम्पियन्स एडिशनच्या लॉंचची घोषणा केली. भारतातील आपल्या संस्मरणीय 10व्या वर्धापन




दिन साजरा करण्यानिमित्त शाओमीने अर्जेन्टाइन फूटबॉल असोसिएशन (एएफए) सोबत सहयोगाने इंडिया-एक्सक्लुसिव्ह क्रिएशन रेडमी नोट 13 प्रो+ 5जी वर्ल्ड चॅम्पियन्स एडिशन लॉंच केला. या स्मार्टफोनमध्ये वैविध्यपूर्ण निळ्या व सफेद रंगाच्या स्ट्राइप्स आहेत. तसेच या स्मार्टफोनसोबत विशेषरित्या डिझाइन केलेले कलेक्टिबल गिफ्ट बॉक्स, सानुकूल एएफए एडिशन 120 हायपरचार्ज, यूएसबी टाइप-सी केबल आणि फूटबॉल-प्रेरित सिम इजेक्टर पिन असे सर्वोत्तम ॲक्सेसरीज येतात. टॉप-ऑफ-द-लाइन वैशिष्ट्यांसह धूळ व जलरोधकसाठी आयपी68 प्रोटेक्शन, अस्सल 200 मेगापिक्सल कॅमेरा आणि कॉर्निंग गोरिला ग्लास व्हिक्टसचे संरक्षण असलेला 3डी कर्व्ह एएमओएलईडी डिस्प्ले असलेला हा स्मार्टफोन 34,999 रूपये या किमतीत उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे शाओमीने संपूर्ण लाइनअपवर अभूतपूर्व किमतींची घोषणा केली. आता 15,499 रूपयांच्या निव्वळ प्रभावी किमतीपासून सुरू होणाऱ्या रेडी नोट 13 सिरीज 5जी सह शाओमीचा अधिकाधिक ग्राहकांना नोट सिरीज प्रदान करणाऱ्या दर्जात्मक तंत्रज्ञानाचा अनुभव घेण्यास सक्षम करण्याचा मनसुबा आहे. रेडमी नोट 13 5जी आता 6 जीबी + 128 जीबी साठी 15,499 रूपये, 8 जीबी + 256 जीबी साठी 17,499 रूपये आणि 12 जीबी + 256 जीबी साठी 19,499 रूपये या निव्वळ सुरूवातीच्या किमतींमध्ये उपलब्ध असेल. रेडमी नोट 13 प्रो 5जी आता 8 जीबी + 128 जीबी साठी 21,999 रूपये, 8 जीबी + 256 जीबी साठी 23,999 रूपये आणि 12 जीबी + 256 जीबी साठी 25,999 रूपये या निव्वळ सुरूवातीच्या किमतींमध्ये उपलब्ध असेल रेडमी नोट 13 प्रो+ 5जी आता 8 जीबी + 256 जीबी साठी 27,999 रूपये, 12 जीबी + 256 जीबी साठी 29,999 रूपये आणि 12 जीबी + 512 जीबी साठी 31,999 रूपये या निव्वळ सुरूवातीच्या किमतींमध्ये उपलब्ध असेल, ज्यामध्ये ऑफर्सचा समावेश आहे. हे व्हेरिएण्ट्स बँक ऑफर्ससह एमआय डॉट कॉम, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, शाओमी होम्स आणि शाओमी रिटेल्सवर उपलब्ध असतील.

# थोडक्यात




## फ. मु. शिंदे यांच्या 'त्रिकाल'चे शुक्रवारी (ता. 17) प्रकाशन

**पुणे (आरंभ पर्व) :** न्यू इरा पब्लिकेशन प्रकाशित प्रसिद्ध लेखक, कवी फ. मु. शिंदे यांच्या 'त्रिकाल' काव्यसंग्रहाचे प्रकाशन येत्या शुक्रवारी (दि. 17) सकाळी 10.30 वाजता डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी येथे होणार आहे. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या शुभहस्ते होणाऱ्या या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, माजी संमेलनाध्यक्ष भारत सासणे असणार आहेत. विडंबनकार, निर्माते, लेखक व दिग्दर्शक रामदास फुटाणे यांची विशेष उपस्थिती, तर लेखक-समीक्षक रमेश वरखेडे, स्त्रीरोगतज्ज्ञ व कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर व लेखक-समीक्षक प्रा. डॉ. राजशेखर शिंदे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळली!

**पिंपरी (आरंभ पर्व) :** रसायनयुक्त पाणी इंद्रायणी नदीत सोडले जात असल्याने पुन्हा एकदा पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग (फेस) आला आहे. मागील सलग तीन दिवसांपासून नदीतील पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग येत आहे. दरम्यान, इंद्रायणी नदीत रसायनयुक्त पाणी सोडणाऱ्या जाधववाडीतील एका भंगार व्यावसायिकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंद्रायणी नदीचा उगम हा लोणावळा परिसरातून झाला. ही नदी अनेक गावे, शहर पार करत आळंदीतून पुढे वाहत जाते. इंद्रायणी नदीचे 19 किलोमीटर पात्र पिंपरी-चिंचवड शहरातून वाहते. शहरातील औद्योगिक वसाहती, इंद्रायणी नदीकाठच्या कारखान्यातील रसायनयुक्त पाणी, गावांमधील मैलायुक्त पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदी पात्रात सोडले जाते. मैलायुक्त पाणी हे इंद्रायणी नदीला प्रदूषित करत आहे. इंद्रायणी नदी पात्रात लाखो वारकरी मोठ्या श्रद्धेने स्नान करून माऊलींचे दर्शन घेतात. परंतु, नदीची अवस्था बघता लाखो वारकऱ्यांचे आणि आळंदीतील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आधीच जलपर्णीने इंद्रायणीचा श्वास गुदमरत आहे. आता त्यात जलप्रदूषणाची भर पडली असून अवघ्या नदीपात्रात तवंग दिसत आहे. रसायनयुक्त पाणी सोडल्यानेच नदीची अशी अवस्था झाल्याचे बोलले जात आहे. गेल्या तीन दिवसांपासून आळंदी येथील पाण्यावर पुन्हा तवंग येत आहेत. रसायनयुक्त पाणी इंद्रायणी नदीत सोडून नदी प्रदूषण केल्याने जाधववाडीतील भंगार व्यावसायिक रेहान एंटरप्रायजेसचे मालक अब्दुलमलीक अब्दुलजब्बार खान याच्या विरोधात चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी खान याचे कुदळवाडी परिसरात भंगारचे गोदाम आहे. त्याच्या गोदामातून रसायनयुक्त हिरवे लाल रंगाचे सांडपाणी इंद्रायणी नदीत मिसळत असल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत महापालिकेकडून पाहणी करून खातरजमा करण्यात आली. भंगार गोदाम लाखबंद (सील) करण्यात आले.

# नवले हॉस्पिटल परिसरातील रस्त्यावर वाहते सांडपाणी

### नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता



> जनतेसाठी मूलभूत सुविधा महत्वाच्या आहेत.ह्यां भागात वारंवार ड्रेनेज कचरा व समस्यावर प्रशासनाने कार्यवाही करायला हवी. रस्त्यावर वाहणाऱ्या ड्रेनेजमुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतात.अरुंद रस्ता भरधाव वेगाने वाहणारे टँकर व वर्दळीची वाहतुक याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.
>
> - श्री.भूपेंद्र मोरे, सामाजिक कार्यकर्ते

**पुणे/ लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे गावं हे सर्वात मोठी ग्रामपंचायत व महसूल देणारी ग्रामपंचायत मनपामध्ये येऊन दोन वर्ष झाली आहेत मात्र येथील समस्यांनी गड्या आपला गावं (ग्रामपंचायत) बरी असा नागरिकांची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

कचरा आणि रस्त्यावर वाहणारे ड्रेनेजचे सांड पाणी यामुळे दिवसांची सुरवात हीं नाकाला रुमाल लावून सुरवात होत आहे.

पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केलेल्या गावांमध्ये नागरी सुविधांची अत्यंत वानवा होत आहे. शिवाय कर्मचारी व इतर सुविधा कमतरता असल्यामुळे या भागातील कचरा व इतर समस्येवर ताण पडत असल्याचे महानगरपालिकेचे म्हणणे आहे.

नऱ्हे ते धायरी फाटा मार्गावर गेल्या आठवड्याभरापासून देण्याचे सांडपाणी रस्त्यावरून वाहत नवले हॉस्पिटलच्या दिशेन ओढ्यात जातं आहे.

या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर प्रवाशी नागरिक रुग्ण यांची वर्दळ असते. या सांडपाण्यामूळे आरोग्यावर दुष्परिणाम होऊन आजारांना निमंत्रण मिळते आहे. त्यामुळे यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा असे नागरिकांचे म्हणणं आहे. नागरी लोकवस्ती मोठ्या प्रमाणात असल्याने ड्रेनेज लाईन बदलण्याची गरज भासत आहे. त्यामुळे इतर काहीहीं न द्या पण नागरी सुविधा तरी किमान द्या अशी मागणी तीव्र होत आहे.

## पिंपरी : मतदानाला गेले आणि चोरट्याने घर

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

मतदान करण्यासाठी गेल्यानंतर बंद असलेल्या सदनिकेचे कुलूप तोडून दोन लाख 37 हजारांचा ऐवज लांबविणाऱ्या सराइत चोरट्याला पोलिसांनी अटक केली.

ही घटना सोमवारी ( 13 मे) दुपारी उद्यमनगर, पिंपरी येथे घडली. रोहन राणोजी शिंदे (वय 23, रा. विठ्ठलनगर, पिंपरी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. उद्यमनगर मधील श्रुती एन्क्लेव्ह या गृहनिर्माण संस्थेत राहणारे दीपक मुरलीधर वाघमारे हे सोमवारी दुपारी सदनिकेला कुलूप लावून मतदान करण्यासाठी गेले. ते पावणे चारच्या सुमारास मतदान करून परत आले असता सदनिकेचे कुलूप तुटलेल्या स्थितीत होते. त्यांनी घरात जाऊन पाहणी केली असता त्यांच्या घरातून सोन्याचे 32 ग्रॅम दागिने, घड्याळ, दोन मोबाईल फोन असा एकूण दोन लाख 37 हजार 900 रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे आढळले. वाघमारे यांनी पिंपरी ठाण्यात गुन्हा नोंदवला. सराइत गुन्हेगार रोहन याने हा गुन्हा केल्याचे समोर आले.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेत चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून दोन लाख 37 हजार 900 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## डॉ. सलील कुलकर्णी यांचा 'मना तुझे मनोगत'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समवेदना संस्थेच्या 21 व्या वर्धापनदिनानिमित्त प्रसिद्ध दिग्दर्शक, संगीतकार आणि गायक डॉ. सलील कुलकर्णी यांच्या 'मना तुझे मनोगत' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आज गुरुवारी (दि. 16) सायंकाळी 5.30 वाजता एमईएस बालशिक्षण सभागृह, मयूर कॉलनी, कोथरूड पुणे येथे हा कार्यक्रम होणार आहे. देणगीदार व हितचिंतकांप्रती कृतज्ञतेच्या भावनेतून आयोजित हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे.



> **गुरुवार, दि. १६ मे २०२४**
>
> समवेदना संस्थेच्या २१ व्या वर्धापनदिनानिमित्त 'मना तुझे मनोगत' सांगीतिक व गप्पांचा कार्यक्रम
>
> सादरकर्ते : डॉ. सलील कुलकर्णी, अध्यक्ष - डॉ. राजेंद्र हिरेमठ, उपस्थिती - डॉ. चारुदत्त आपटे
>
> वेळ : सायंकाळी ५.३० वाजता, ठिकाण : एमईएस बालशिक्षण मंदिर, मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे.

डॉ. सलील कुलकर्णी पालकत्व, मुलांशी संवाद, नातेसंबंध व कथाकथन अशा विविध विषयांवर गप्पा, संगीत, गाणी व कवितांच्या माध्यमातून त्यांच्या अनोख्या शैलीत मनमोकळ्या गप्पा मारणार आहेत. जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. तर 'समवेदना'चे संस्थापक डॉ. चारुदत्त आपटे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती 'समवेदना'चे मुख्य व्यवस्थापक अमर पवार यांनी दिली.

समवेदना संस्था आरोग्य क्षेत्रात काम करत असून, उपचार, प्रतिबंध आणि प्रसार या त्रिसूत्रीवर आधारित विविध उपक्रम राबविते. गरीब रुग्णांना आर्थिक मदत, शालेय आरोग्य व महिलांसाठी कॅन्सर उपक्रम सोबत मानसिक स्वास्थ्य चा विषय नव्याने हाती घेतला आहे. यंदा समवेदना उपक्रमांचा 20,000 हून अधिक शहरी गरीब व ग्रामीण व्यक्तीनी लाभ घेतला. यामध्ये 12000 पेक्षा अधिक शालेयवयीन मुलांचा समावेश आहे. या मुलांसोबत काम करताना त्यांच्या सामाजिक आणि मानसिक समस्या समोर येत आहेत. त्याच अनुषंगाने यावर्षीचा कार्यक्रम उपयुक्त ठरणार आहे, असे अमर पवार यांनी नमुद केले.

## 'मलाबार'ला लक्ष्य करणाऱ्या बदनामीकारक मोहिमेविरुद्ध न्यायालयाचा निवाडा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मलाबार समूहाच्या सुमारे 77,000 वंचित समाजघटकांतील मुलींना शैक्षणिक प्रगतीसाठी मदतकारक शिष्यवृत्ती उपक्रमाच्या विरोधात समाज-माध्यम मंचावर बदनामी आणि चुकीची माहिती प्रसारित करणाऱ्यांविरोधात मुंबई उच्च न्यायालयाने, गुरुवारी 9 मे रोजी, कठोर शब्दात ताशेरे ओढत महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

MALABAR
GOLD & DIAMONDS
CELEBRATE THE BEAUTY OF LIFE

न्यायालयाने मलाबार गोल्ड लिमिटेडला अंतरिम दिलासा दिला आणि प्रतिवादीच्या ट्विटर हँडलवरून बदनामीकारक मजकूर ताबडतोब काढून टाकावा आणि त्या व्यक्तीला पुढील बदनामीकारक विधाने करण्यापासून रोखण्याचेही निर्देश दिले.

न्यायालयाने एक्स (पूर्वीचे ट्विटर), इन्स्टाग्राम आणि मेटा प्लॅटफॉर्म्स इन्क. या समाज-माध्यम मंचांना बदनामीकारक सामग्रीशी संबंधित कोणत्याही पोस्ट किंवा टिप्पण्या काढून टाकण्याचे निर्देश दिले आणि निर्दिष्ट यूआरएलवरून भविष्यात तत्सम सामग्री अपलोड करण्यास देखील न्यायालयाने मनाई केली.

केवळ एका विशिष्ट समुदायातील मुलींना शिष्यवृत्ती देण्यात येत असल्याचे दर्शविणारे एक छायाचित्र निवडक स्वरूपात प्रसिद्ध करून, शिक्षणाच्या माध्यमातून मुलींना सक्षम बनवण्याच्या व्यापक उपक्रमाकडे दुर्लक्ष करण्याच्या प्रतिवादी पक्षाच्या वृत्तीवर न्यायालयाने कठोर शब्दांत टीका केली.

या कृत्यामुळे मलाबार समूहाच्या प्रतिष्ठेला आणि सद्भावनेला हानी पोहोचत असून समाजात फूट निर्माण करण्याची देखील त्यात क्षमता दिसून येते यावरही न्यायालयाने जोर दिला. शिवाय, विविध समाज-माध्यमा मंचांवर दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करणे हा मलाबार समूहाच्या प्रतिष्ठेला नुकसान पोहोचवण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न आहे, असे न्यायालयाने मत व्यक्त केले.

मलाबार गोल्ड लिमिटेड ही "मलाबार गोल्ड अँड डायमंड्स" या ब्रँड नावाखाली सोने, चांदी, मौल्यवान खडे, हिरे आणि प्रीमियम घड्याळे यापासून बनवलेल्या दागिन्यांचे आणि इतर वस्तूंचे उत्पादन आणि किरकोळ विक्रीत गुंतलेली एक प्रमुख कंपनी आहे.

न्यायालयाने यावर जोर दिला की मलाबार समूहाचे परोपकारी प्रयत्न, विशेषत: तरुण मुलींना त्यांची जात, पंथ किंवा धर्म काहीही असो, समूहाकडून होणारी शिष्यवृत्तीची तरतूद कौतुकपात्र आहे, हे मान्यच केले पाहिजे. भेदभावपूर्ण प्रथांच्या विपरीत, ही शिष्यवृत्ती मुलींच्या धार्मिक किंवा जातीय संबंधांऐवजी त्यांच्या प्रतिभा आणि संभाव्यतेच्या आधारावर दिली जाते, असे न्यायालयाने आवर्जून नमूद केले.

न्यायालयाने मलाबार समूहाने हाती घेतलेल्या सामाजिक दायीत्व (सीएसआर) उपक्रमांची आणि त्याच्या फलश्रुतीचीही कबुली दिली, ज्यामध्ये देशभरातील 77,000 पेक्षा जास्त मुलींना शिष्यवृत्तीची तरतूद आणि एकंदर विविध सामाजिक कल्याणकारी उपक्रमांवरील 246 कोटी रुपयांचा समूहाने केलेला खर्च, विशेषत: महिला सक्षमीकरणासाठी उपकारक ठरला आहे.

# परिचारिकांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन

### डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे येथे आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन उत्साहात साजरा

**पिंपरी पुणे (दै. आरंभ पर्व)**

आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे, येथे परिचारिकांच्या सन्मानार्थ आणि त्यांच्या आरोग्य सेवेमधील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि. 7 ते 14 मे 2024 या कालावधीत डॉ. भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा दिवसीय कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते. या विविध उपक्रमांच्या माध्यमातून परिचारिकांच्या कला गुणांना वाव मिळावा व त्यांच्यातील मैत्री व जवळीक वाढावी तसेच दैनंदिन कामांमधून थोडा विरंगुळा मिळावा आणि आरोग्य सेवेमध्ये बंधुत्वाचा कणा असलेल्या परिचारिकांच्या अमूल्य योगदानाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात आला होता.




आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये परिचारिकांसाठी अनेक उपक्रम घेण्यात आले. यामध्ये सर्व परिचारिकांनी हिरीरीने सहभाग घेतला होता. पहिल्या दिवशी 'माझे आरोग्य, माझे हक्क' या थीम अंतर्गत भिंतीचित्र स्पर्धा व प्रदर्शन घेण्यात आली. दुसऱ्या दिवशी नर्सिंग विषयक प्रश्नमंजुषा - 'कोन बनेगा ज्ञानपती' आणि तंबोला सारखे मजेदार खेळ आयोजित केले गेले. तिसऱ्या दिवशी नृत्य व गाण्यांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. चौथ्या दिवशी स्किट आणि कविता स्पर्धा, पाचव्या दिवशी फॅशन शो आणि स्टँड अप कॉमेडी आणि शेवटच्या दिवशी डॉ. भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ) यांच्या उपस्थितीत आणि सर्व परिचारिकांसमवेत संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धात्मक कार्यक्रमाची सांगता बक्षीस वितरण सोहळ्यातून झाली यावेळी विजेत्यांना सन्मानचिन्ह, पदक, प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले, तसेच विशेषतः विविध विभागातील 36 परिचारिकांना "सर्वोकृष्ट परिचारिका" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ एन. जे पवार, वैद्यकीय महाविद्यालयाच्या शैक्षणिक विभागाच्या संचालिका डॉ. वत्सला स्वामी, महाविद्यलयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमरजित सिंग, अधिष्ठाता डॉ जितेंद्र भवाळकर, वैद्यकीय रुग्णलयाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा करमरकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. एच. एच. चव्हाण, परिचारिका विभागाच्या संचालिका नीलाक्षी श्रीवास्तवा आदी उपस्थित होते. रुग्ण परिचर्या क्षेत्राच्या प्रणेत्या फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सर्व परिचारिकांनी शपथ घेतली.

डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरीच्या परिचारिका विभागाच्या संचालिका नीलाक्षी श्रीवास्तवा म्हणाल्या या उपक्रमाचे नियोजन व ते पूर्णत्वास नेण्यासाठी मदत करणाऱ्या सहकारी आणि सहभागी सर्व परिचारिकांचे अभिनंदन केले. आपल्या कामामधून रुग्णसेवेशी असलेली निष्ठा सर्वांना प्रोत्साहन देते आहे. एक नियोजनबद्ध परिचर्या क्षेत्र हा भक्कम आरोग्य सेवा क्षेत्राचा एक अत्यावश्यक भाग असून त्यासाठी डीपीयू हॉस्पिटल आम्हाला नेहमीच प्रोत्साहन देते आहे." ही भावना त्यांनी व्यक्त केली.

आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त शुभेच्छा देताना डॉ. भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे म्हणाल्या की, "परिचारिका म्हणजे रुग्णाची काळजी घेणारे मन आणि आत्मा आहेत. त्यांचे परिश्रम आणि समाजाच्या सेवेसाठी देत असलेल्या योगदानासाठी सर्व प्रथम मी त्यांना धन्यवाद देते. आरोग्य सेवा क्षेत्रात परिचारिका महत्त्वाची भूमिका बजावतात तसेच डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील सर्वात महत्त्वाचा दुवा ही असतात. दिवस असो वा रात्र, चेहऱ्यावर कोणतीही नाराजी न दर्शवता रुग्णांच्या वैद्यकीय गरजा पूर्ण करणाऱ्या परिचारिका या खऱ्या अर्थाने नायक असून त्या आरोग्य क्षेत्राचा महत्वाचा आधारस्तंभ आहेत." डॉ. डी वाय पाटील विद्यापीठाचे खजिनदार व विश्वस्त डॉ यशराज पाटील म्हणाले, "डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी येथे आयोजित विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन सर्व परिचारिकांनी या दिनाचा उत्साह वाढविला. प्र-कुलपती डॉ. भाग्यश्री पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन सर्वच परिचारिकांना एक नवी उमेद देत रुग्णसेवेला अधिक बळ देईल आणि आदर्श परिचारिका म्हणून आपण नावलौकिक वाढवाल "असा विश्वास डॉ यशराज पाटील यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले आमचे हॉस्पिटल आंतरराष्ट्रीय दर्जाच्या रुग्ण सेवा सुविधांच्या माध्यमातून परिचारिकांच्या कौशल्य गुणांना सक्षम करीत आरोग्यहित साध्य करीत आहे. डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा करमरकर यांनी सर्व परिचारिकांचे कौतुक केले "आज हॉस्पिटलच्या रुग्ण व्यवस्थापनात परिचारिकांचे योगदान तितकेच महत्वाचे आहे रुग्णसेवेतील आपली भूमिका आपण प्रामाणिकपणे बजावत आहात याचा आम्हाला अभिमान आहे.




# भागीदारीची 30 उल्लेखनीय वर्षे - मर्सिडीज-बेंझ इंडिया आणि एक्सॉनमोबिल इंडिया

**भारत (दै. आरंभ पर्व)**

एक्सॉनमोबिल, सिंथेटिक मोटर तेलांमध्ये जागतिक आघाडीवर असलेल्या, मर्सिडीज-बेंझ इंडियासोबतच्या 30 वर्षांच्या यशस्वी भागीदारीचे नुकतेच स्मरण केले. चाकण, पुणे येथील मर्सिडीज-बेंझ इंडिया सुविधेमध्ये आयोजित केलेल्या मैलाचा दगड इव्हेंटमध्ये दोन्ही पायोनियर्समधील चिरस्थायी सहकार्य आणि या क्षेत्रातील नावीन्य आणि परस्पर वाढीसाठी त्यांची वचनबद्धता अधोरेखित झाली.ए-क्लास लिमोझिन, मर्सिडीज मेबॅक एस 580 लिमोझिन आणि जीएलई आणि जीएलएस सारख्या एसयूव्ही चा समावेश असलेल्या भारतातील त्यांच्या वाढत्या लक्झरी पोर्टफोलिओच्या विकसित होत असलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी एक्सॉनमोबिल ने मर्सिडीज-बेंझ सोबत जवळून काम केले आहे. मर्सिडीज-बेंझ त्यांच्या प्रीमियम आणि लक्झरी कारच्या लुब्रिकंट गरजा पूर्ण करण्यासाठी उच्च श्रेणीतील ग्राहकांना त्यांच्या मजबूत सेवा आणि भारतातील विक्रीनंतरच्या काळजी नेटवर्कद्वारे पूर्ण करण्यासाठी एक्सॉनमोबिल वर अवलंबून आहे. या भागीदारीमध्ये चाचणी, क्षेत्रीय चाचण्या आणि देशातील फॅक्टरी आणि सेवा नेटवर्क या दोन्हींना उच्च-गुणवत्तेच्या पूर्ण सिंथेटिक इंजिन तेलांचा पुरवठा समाविष्ट आहे. या भागीदारीने भारतात विकसित होत असलेल्या अत्याधुनिक, आधुनिक आणि महत्त्वाकांक्षी ग्राहक आधाराच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, त्यांची इंजिने अत्यंत कार्यक्षमतेने कार्य करतात याची खात्री करून, विश्वास आणि मूल्य प्रदान केले आहे. एक्सॉनमोबिल ने महाराष्ट्रात जागतिक दर्जाचा ल्युब्रिकंट -उत्पादन कारखाना उभारण्यासाठी आपल्या गुंतवणुकीसह भारतात आपले अस्तित्व मजबूत केले आहे. सिंथेटिक ल्युब्रिकंटच्या विज्ञानात अग्रगण्य, 1974 मध्ये मोबिल 1 लॉंच करून जागतिक स्तरावर सिंथेटिक ल्युब्रिकंट सादर करणारे ते पहिले होते. जागतिक स्तरावर मोबिल 1 ने सर्वात विश्वासार्ह आणि प्रगत सिंथेटिक मोटर तेल ब्रँड म्हणून आपला दर्जा कायम ठेवला आहे. इंजिन कार्यप्रदर्शन आणि संरक्षणामध्ये मोबिल 1 नवीन मानके स्थापित करत आहे, ज्यामुळे ते जगभरातील आघाडीच्या ओईएम साठी पसंतीचे ल्युब्रिकंट बनले आहे. संतोष अय्यर, मर्सिडीज-बेंझ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ, म्हणाले: "मर्सिडीज-बेंझ आणि एक्सॉनमोबिल यांनी भारतात 30 वर्षे पूर्ण करण्याचा एक सामायिक मैलाचा दगड शेअर केला आहे, ज्यामध्ये सतत नवनवीन उपक्रमांद्वारे ग्राहकांचा विश्वास वाढवण्याचे सामायिक दृष्टीकोन आहे. एक्सॉनमोबिल हा मर्सिडीज-बेंझच्या ग्राहकांना आणि आमच्या मोटार तेल पुरवठ्यासह डीलर नेटवर्कला समर्थन देणारा आमचा सर्वात विश्वासू भागीदार आहे, विशेषत: महामारीमुळे उद्भवलेल्या पुरवठ्यातील व्यत्ययांच्या शिखरावर. एक्सॉनमोबिल ची उत्पादने आणि सेवा भारतातील आमच्या जागतिक दर्जाच्या ऑफरशी जुळतात आणि आमच्या सहयोगी भावनेला चालना देणाऱ्या ग्राहकांच्या उत्कटतेला अधोरेखित करतात."

> विपिन राणा, मुख्य कार्यकारी अधिकारी, एक्सॉनमोबिल लुब्रिकंट्स प्रा.लि, म्हणाले: "आमची मर्सिडीज-बेंझ इंडियासोबतची दीर्घ भागीदारी अत्याधुनिक ल्युब्रिकंट तंत्रज्ञानाची साक्ष आहे, ज्यावर जागतिक ऑटोमोबाईल कंपन्यांनी विश्वास ठेवला आहे आणि संपूर्ण भारतातील मर्सिडीज-बेंझ डीलर्सना पुरवठा शृंखला सुरक्षा आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यावर आमचे अटल लक्ष आहे. मर्सिडीज-बेंझ इंडियाने त्यांच्या वाढीच्या पुढील कालखंडाची मांडणी केल्यामुळे, आम्ही त्यांच्या कारसाठी डिझाइन केलेले सर्वोत्कृष्ट इंजिन ऑइल प्रदान करून आणि त्यांच्या डीलर्सना, ग्राहकांना आनंद देण्यासाठी त्यांच्या प्रवासाला पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहोत. भारतातील आमचा 30 वर्षांचा सहवास साजरा करणे हा आमच्यासाठी खूप अभिमानाचा क्षण आहे कारण आम्ही मोबिल 1 ची 50 वर्षे देखील साजरी करत आहोत, आमचे प्रमुख सिंथेटिक इंजिन ऑइल अंतिम इंजिन संरक्षण प्रदान करते. एक्सॉनमोबिल आमच्या ओईएम भागीदारांसह, देशाच्या ऑटोमोटिव्ह क्षेत्रातील वाढीला चालना देण्यासाठी एक प्रमुख खेळाडू म्हणून भारतीय ग्राहकांसाठी वचनबद्ध आहे."

## थोडक्यात



### पुण्यात होर्डिंगबाबत पालिका 'ॲक्शन मोड'वर; कारवाईचे आदेश

**पुणे (आरंभ पर्व) :** मुंबईतील घाटकोपर येथील होर्डिंग कोसळण्याच्या दुर्घटनेनंतर महापालिका प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून, महापालिका आयुक्तांनी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन शहरातील अनधिकृत व धोकादायक होर्डिंगवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. पुढील आठवडाभरात पाहणी करून पंधरा दिवसांत असे होर्डिंग हटवा; अन्यथा संबंधितांवर कारवाई करण्याची तंबीही आयुक्तांनी दिली आहे. महापालिका हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात जाहिरात होर्डिंग आहेत. यामध्ये 2598 अधिकृत होर्डिंग आहेत, ज्यामध्ये होर्डिंग उभारण्याच्या नियमाला तिलांजली देऊन परवानगी दिलेल्यांचा समावेश आहे. याशिवाय 85 अनधिकृत होर्डिंग असून, 1564 अनधिकृत होर्डिंगवर कारवाई केल्याचा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे. पुण्यातील मंगळवार पेठेतील शाहीर अमर शेख चौकात आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील रावेत येथे होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत अनेकांचा प्राण गेल्यानंतर महापालिकेने शहरातील होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना शहरातील अधिकृत होर्डिंगमालकांना केल्या होत्या. तसेच अनधिकृत होर्डिंग जमीनदोस्त करण्याची मोहीम हाती घेतली होती. मात्र, काही दिवसांनंतर सर्व कारवाई गुंडाळण्यात आली. आत्तापर्यंत 2249 होर्डिंगचा स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल महापालिकेला सादर केला असून, 359 होर्डिंगचे अहवाल अद्यापही आले नाहीत. दरम्यान, मुंबईतील घाटकोपर येथे मंगळवारी भलेमोठे होर्डींग कोसळले. या दुर्घटनेनंतर पुणे महापालिका ॲक्शन मोडवर आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी बुधवारी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त आणि विभागप्रमुखांची बैठक घेतली.

### मंदिरात शॉर्ट्स घालून गेल्याने अंकिता लोखंडे ट्रोल

**पुणे (आरंभ पर्व) :** 'पवित्र रिश्ता' या मालिकेत साध्याभोळ्या अर्चनाची भूमिका साकारून अभिनेत्री अंकिता लोखंडे घराघरात पोहोचली. काही महिन्यांपूर्वी ती पती विकी जैनसोबत 'बिग बॉस' या शोमध्ये स्पर्धक म्हणून सहभागी झाली होती. अंतिम पाच स्पर्धकांमध्ये आपलं स्थान निश्चित केल्यानंतर ती या शोमधून बाद झाली. बिग बॉसनंतर अंकिता 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली. याशिवाय तिच्या एका वेब शोचीही घोषणा झाली आहे. आता अंकिता तिच्या एका व्हिडीओमुळे सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. या व्हिडीओवर कमेंट करत नेटकरी तिच्यावर टीका करत आहेत. त्यामागचं कारण म्हणजे अंकिताने परिधान केलेले कपडे. मंदिरात शॉर्ट्स घालून घेल्याने नेटकरी अंकितावर भडकले आहेत. अंकिताचा हा व्हिडीओ काही पापाराझींनी शूट केला आहे. मुंबईतील एका मंदिरात देवाचं दर्शन घेतल्यानंतर ती तिच्या कारकडे चालत येत होती. त्यावेळी पापाराझींनी तिचा हा व्हिडीओ शूट केला. मात्र मंदिरात जाण्यासाठी अंकिताने जे कपडे घातले होते, ते पाहून नेटकऱ्यांचा पारा चढला. सोशल मीडियावर तिचा हा व्हिडीओ व्हायरल होत असून त्यावर विविध प्रतिक्रिया येत आहेत.

## 'मल्हार' येतोय 31 मे रोजी भेटीला; मराठी, हिंदी भाषेत होणार प्रदर्शित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

व्ही मोशन पिक्चर्स प्रस्तुत 'मल्हार' या नव्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली असून या चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित झाले आहे. 31 मे 2024 रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट मराठी आणि हिंदी दोन्ही भाषेत प्रदर्शित होणार आहे. 'मल्हार'चे पोस्टर आणि शीर्षकाची झलक पाहून प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली असेल ! ही कथा गुजरात प्रदेशामधील कच्छच्या ग्रामीण भागात घडत असून तीन वेगवेगळ्या कथा येथे घडताना दिसणार आहेत. ज्या एकमेकांशी संबंधित आहेत. पोस्टर पाहून प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दल नक्कीच उत्सुकता निर्माण झाली असेल, याची खात्री आहे. 'मल्हार'चे निर्माते प्रफुल पासड असून या चित्रपटात अंजली पाटील, शारीब हाश्मी, ऋषी सक्सेना, बालकलाकार श्रीनिवास पोकळे, विनायक पोद्दार, मोहम्मद समद, अक्षता आचार्य आणि रवी झंकाल प्रमुख भूमिकेत दिसत आहेत.




## जागतिक अब्जाधीशांच्या यादीत पुण्यातील उद्योजक!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यात मुख्यालय असलेल्या केपीआयटी टेक्नॉलॉजीजचे अध्यक्ष रवी पंडित यांनी आता फोर्ब्सच्या जागतिक अब्जाधीशांच्या यादीत स्थान मिळविले आहे. जगभरातील आघाडीच्या वाहननिर्मिती कंपन्यांना केपीआआयटी सॉफ्टवेअर सोल्यूशन्स पुरविते. याआधी पुण्यातील पर्सिस्टंट सिस्टीम्सचे संस्थापक, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आनंद देशपांडे यांनी या यादीत स्थान मिळविले होते.



पंडित हे सध्या केपीआयटीचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. केपीआयटीचे बाजारभांडवल 40 हजार 500 कोटी रुपये आहे. कंपनीकडून बीएमडब्ल्यू, होंडा, फोर्ड आणि जनरल मोटर्स यासारख्या जागतिक पातळीवरील वाहननिर्मिती कंपन्यांना सॉफ्टवेअर सोल्यूशन्स पुरविली जातात. सध्या कंपनीत 12 हजारांहून अधिक कर्मचारी कार्यरत असून, युरोप, अमेरिका, जपान, चीन, थायलंडमध्ये कंपनीची कार्यालये आहेत.

पंडित यांची संपत्ती 1.2 अब्ज डॉलर असून, गेल्या वर्षभरात केपीआयटीच्या समभागात तेजी दिसून आली आहे. भांडवली बाजारात कंपनीच्या समभागात झालेल्या वाढीमुळे फोर्ब्सच्या जागतिक अब्जाधीशांच्या 2024 च्या यादीत पंडित यांनी स्थान पटकावले आहे. गेल्या चार वर्षांत भांडवली बाजारात केपीआयटीच्या समभागात 3 हजार 600 टक्के वाढ झाली आहे. केवळ गेल्या वर्षी समभागात 82 टक्के वाढ नोंदविण्यात आली. गेल्या वर्षी कंपनीचा महसूल 1 हजार 516 कोटी रुपये तर नफा 280 कोटी रुपये होता.

### सनदी लेखापाल ते आयटी क्षेत्र

रवी पंडित हे सनदी लेखापाल असून, त्यांच्या वडिलांचा सनदी लेखापाल सेवा कंपनी होता. हा व्यवसाय जागतिक पातळीवर नेण्याची त्यांची महत्वकांक्षा होती. यासाठी त्यांनी एमआयटी स्लोन स्कूल ऑफ मॅनेजमेंटमधून व्यवस्थापन शाखेचे पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्यानंतर ते भारतात परतले. नंतर त्यांनी वडिलांच्या कीर्तने पंडित कंपनीचे रुपांतर हळूहळू माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील कंपनीत करण्यास सुरूवात केली. त्यामुळे पुढे कंपनी केपीआयटी टेक्नॉलॉजीज या नावाने नावारूपास आली.

## पीएमपी-चारचाकीचालकाचा रस्त्यातच 'राडा'

- फर्ग्युसन रस्त्यावरील घटना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पीएमपी बसचालक आणि एका चारचाकीचालकाचा वाद झाल्याची घटना नुकतीच फर्ग्युसन रस्त्यावर घडली. त्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. अशा घटना सातत्याने घडत असून, त्या थांबविण्यासाठी पीएमपी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे. पीएमपी आणि इतर वाहनचालकांचे रस्त्यावर वाद झाले नाहीत, असा दिवस उजाडलेला नाही. दररोज शहराच्या कोणत्या ना कोणत्या रस्त्यावर, चौकामध्ये पीएमपी बसचालक आणि इतर वाहनचालकांचे वाद हे होताना दिसतातच. हे वाद अनेकदा हाणामारीपर्यंत जातात, दोन्ही वाहनचालकांची डोकी फुटतात, रक्त वाहते. पोलिसांत गुन्हे दाखल होतात. यात चुकी कोणाची, यावरून शहरातील पोलिस ठाणी आणि चौक्यांमध्येच बसमधील प्रवाशांना घेऊन अनेकदा न्यायालयच भरते.



कधी चुकी बसचालकाची असते, तर कधी वाहनचालकाची. मात्र, अशा घटना पीएमपी बसचालकांकडूनच सातत्याने होत असल्याचे समोर आले आहे. त्यातही हे बसचालक सर्वाधिक पीएमपीच्या ठेकेदारांकडील असल्याचे अनेकदा दिसते.

ठेकेदारांकडील चालक हे अनेकदा पगारांवरून, सोयी-सुविधा मिळत नसल्याने संप करताना दिसतात. ते कायम नाराज असतात. या चालकांनी पगारवाढीसाठी मागे एकदा मोठा संप पुकारून पीएमपीची सेवा ठप्प करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तत्कालीन अध्यक्ष सचिंद्र प्रताप सिंह यांनी मेस्मा लावून संप दडपून टाकला. अन् अशाप्रकारे संप पुन्हा होऊ नये, याकरिता पीएमपीच्या स्वमालकीच्या चालकांना ई-बस चालवण्याचे प्रशिक्षण दिले. त्यामुळे ठेकेदारांच्या चालकांचे संपाचे शस्त्रदेखील निकामी झाले. यामुळे पगारवाढीचा प्रश्न तसाच राहिला. परिणामी, त्यांची घरसंसार चालवताना मोठी ओढाताण होत आहे. त्यांची मानसिक स्थिती बिघडत असून, याचा कुठेतरी राग गाडी चालवताना निघून, अशा प्रकारच्या वादावादीच्या घटना घडत असतील का? असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे.

## मराठी चित्रपट 'डिअर लव्ह' 24 मे पासून महाराष्ट्रात सर्वत्र प्रदर्शित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ए. एस. के. फिल्म निर्मित पहिला मराठी चित्रपट 'डिअर लव्ह' येत्या 24 मे पासून महाराष्ट्रात सर्वत्र प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन अमरनाथ खराडे आणि ऋषिकेश तुराई यांनी केले असून, या चित्रपटात अमरनाथ खराडे, किरण ढाणे, यशोधन गडकरी, अभिषेक वेर्णेकर, लक्ष्मी विभूते, राहुल जगताप आदी कलाकरांनी काम केले आहे.

या चित्रपटासाठी संगीत प्रफुल्ल-स्वप्निल यांचे असून गायक शंकर महादेवन, आनंदी जोशी, हर्षवर्धन वावरे, स्वप्निल गोडबोले' तर पार्श्वसंगीत साऊथ सिनेमातील ॲलन प्रितम यांनी दिले आहे. 'डिअर लव्ह' हा चित्रपट नावाप्रमाणे फक्त प्रेमकथेवर आधारीत नसून, स्वप्न, प्रेम आणि नातेसंबंध यावर बेतलेला आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण कोकण, सांगली, सातारा परिसरात निसर्गरम्य ठिकाणी झाले आहे. अमरनाथ खराडे, किरण ढाणे यांनी यापूर्वी 'लागिर झालं जी' या टी.व्ही. मालिकेत भूमिका साकारल्या आहेत, त्यानंतर त्यांनी अनेक टि. व्ही. मालिका, जाहिराती, तसेच चित्रपटात भूमिका केल्या आहेत.





## मावळमध्ये प्रचार खर्चात आघाडीवर बारणे की वाघेरे?

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

मावळ लोकसभा मतदारसंघातील निवडणूक प्रचार खर्चात महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे हे आघाडीवर आहेत. त्यांनी सर्वाधिक 59 लाख 166 रुपयांचा खर्च केला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी 57 लाख 12 हजार 542 रुपये खर्च करून प्रचार केला. दोघांच्याही प्रचार खर्चात तफावत असल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून नोटीस बजाविण्यात आली आहे.





मावळ लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाची तीन वेळा तपासणी करण्यात आली. पहिली तपासणी 3 मे, दुसरी 7 मे आणि तिसरी तपासणी 11 मे रोजी करण्यात आली. यापैकी पहिल्या तपासणीत बारणे आणि वाघेरे यांच्या प्रचार खर्चात तफावत आढळली होती. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी नोटीस बजावली होती. या उमेदवारांच्या प्रतिनिधींनी तफावतीचा खर्च अमान्य केला आहे. शेवटच्या खर्च तपासणीत देखील या दोघांच्या निवडणूक प्रतिनिधींनी सादर केलेला खर्च आणि प्रशासनाच्या शॅडो रजिस्टरमधील खर्चात तफावत आली आहे. बारणे यांनी 43 लाख 81 हजार 166 रुपयांचा खर्च दाखविला. तर, निवडणूक विभागाच्या नोंदवहीत 59 लाख 166 रुपये खर्च झाल्याची नोंद केली आहे. बारणे यांच्या हिशेबात 15 लाख 19 हजार रुपयांची तफावत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

वाघेरे यांनी 49 लाख 81 हजार 690 रुपयांचा खर्च दाखविला. तर, निवडणूक विभागाच्या नोंदवहीत 57 लाख 12 हजार 542 रुपये खर्च झाल्याची नोंद आहे. वाघेरे यांच्या हिशेबात 7 लाख 30 हजार 852 रुपयांची तफावत आढळली आहे. खर्चातील तफावतीबाबत बारणे आणि वाघेरे यांना नोटीस बजावण्यात आली असून, त्यावर खुलासा करावा लागणार आहे. खुलासा न केल्यास हा खर्च मान्य असल्याचे समजून संबंधित उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट केला जाणार आहे.

### तीन अपक्ष उमेदवारांनाही नोटिसा

अपक्ष उमेदवार शिवाजी जाधव, यशवंत पवार आणि संतोष उबाळे या तीन उमेदवारांनी दैनंदिन खर्चाची माहिती तपासणीसाठी उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे त्यांनाही नोटीस देण्यात आली आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.